क्रमांक-पीटीके/वतन/एसआर/२५/२०१३ दिनांक-१९/०३/२०१९

वाचा- १) तहसिलदार हवेली यांचेकडील अहवाल क्र.ए.जी.ना./एसआर/२/२०१५ दि.०४/१२/२०१७ व क्र.वतन/कावि/१८६/२०१८ दि.०८/०३/२०१८

२) श्री. वसंत रामचंद्र खांदवे व श्री. मोहन रामचंद्र खांदवे, रा.स.नं.२७२, वडगांवशिंदे रोड, बंधुप्रेम ट्रेडर्स, ता. हवेली, जि. पुणे यांचा दि.०५/०३/२०१९ रोजीचा अर्ज.

३) मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील क्र.मह/वतन/आरआर/९०२/२०१४ दि.२२/०९/२०१४

४) मा. महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांचेकडील क्र.रा.रा.ले.प.(मुं)/नि.प्र./I. No.59 दिनांक 14/07/2016

५) या कार्यालयाकडील आदेश क्र.पीटीके/वतन/एसआर/२५/१३ दि.०९/१२/२०१३

---

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
कुळकायदा शाखा
क्र.पीटीके/वतन/एसआर/२५/१३
पुणे १, दि.१९/०३/२०१९

अपर जिल्हाधिकारी सत्यमेव जयते पुणे

**विषय:-** **भुतपूर्व इनाम वर्ग ६ब जमीन**
मौजे पिंपरी सांडस ता.हवेली जि.पुणे येथील ग.नं.३९० पैकी २ हे. ९४ आर क्षेत्रास **शेती प्रयोजनार्थ** विक्री परवानगी मिळणेबाबत.

**दुरुस्त आदेश :-**

मा. महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, नागपूर यांचेकडील तपासणी पथकाने दि.०८/०६/२०१६ ते १७/०६/२०१६ या कालावधीत तहसिल कार्यालय हवेली यांची तपासणी केलेली असून त्यामध्ये, विषयांकित मौजे पिंपरी सांडस, ता. हवेली, जि. पुणे येथील गट नं.३९० पैकी २ हे.९४ आर क्षेत्रास या कार्यालयाकडील आदेश क्र.पीटीके/वतन/एसआर/२५/१३ दि.०९/१२/२०१३ अन्वये बिनशेती प्रयोजनार्थ विक्री परवानगी देतांना वसूल करावयाच्या ५०% नजराणा रक्कमेमध्ये Short leavy of unearned income Rs.1,74,49,350/- चा ऑडीट पॅरा घेण्यात आला असून सदर रक्कम वसूल करुन पुर्तता अहवाल सादर करणेबाबत त्यांचेकडील क्र.रा.रा.ले.प.(मुं)/नि.प्र./I.No.५९ दिनांक १४/०७/२०१६ अन्वये कळविले आहे.

तहसिलदार हवेली यांनी त्यांचेकडील दि.०४/१२/२०१७ व ०८/०३/२०१८ रोजीचे अहवालान्वये, विषयांकित गट नं.३९० पैकी २ हे.९४ आर बाबत या कार्यालयाकडील आदेश क्र.पीटीके/वतन/एसआर/२५/१३ दि.०९/१२/२०१३ नुसार नियोजित खरेदीदार श्री. बाळासाहेब चंद्रकांत बोराटे यांनी सदर मिळकत खरेदी करुन ती श्री. वसंत रामचंद्र खांदवे व मोहन रामचंद्र खांदवे यांना नोंदणीकृत दस्तान्वये विक्री केलेली श्री. खांदवे हे सदर मिळकतीचा शेती प्रयोजनार्थ वापर करीत आहेत. मा. महालेखाकार नागपूर यांचेकडील ऑडीट पॅरानुसार नजराणा रक्कम वसुलीकामी खरेदीदार यांना नोटीस बजावली असता खरेदीदार श्री. खांदवे यांनी रक्कम भरणेस असमर्थता दर्शवून सदर मिळकतीचा वापर विक्री परवानगी घेतलेपासून शेती कारणासाठीच करीत असून प्रत्यक्ष बिनशेती करतांना फरकाची नजराणा रक्कम भरणार असलेबाबत लेखी म्हणणे सादर केलेले असून प्रलंबित ऑडीट पॅरा वसूलीबाबत आढावा बैठकीमध्ये मा. उपआयुक्त (महसूल) पुणे यांनी विक्री परवानगी आदेश बिनशेती कारणासाठी दिलेले आहेत ते कारण बदलुन शेती प्रयोजनार्थ करणेबाबत आदेश पुनर्विलोकनात घेणेच्या सूचना दिलेल्या आहेत असा अहवाल सादर केला आहे.

तसेच अर्जदार श्री. वसंत रामचंद्र खांदवे व मोहन रामचंद्र खांदवे यांनी त्यांचे दि.०५/०३/२०१९ रोजीचे अर्जान्वये सदर मिळकतीची सा-याचे १० पट व चालुबाजारमुल्याचे ५०% रक्कम अशी एकूण २६,३८,७१४/- इतकी अनर्जित उत्पन्न म्हणून नजराणा रक्कम भरलेली असून सदर मिळकतीचा वापर आज रोजी शेती प्रयोजनासाठीच करीत आहेत. त्यांना बिनशेती परवानगी घेवून सध्या कुठलाही व्यवसाय करावयाचा नाही. प्रत्यक्ष एन.ए. किंवा बिनशेती सक्षम अधिका-याकडून परवानगी घेवु त्या वेळेस फरकाची नजराणा रक्कम भरण्यास तयार आहोत. ऑडीट पॅरा नागपूर यांच्याकडून आलेला शेरा कमी करुन त्यांनी भरलेली रक्कम कायम ठेवून आदेश मिळावा अशी विनंती केलेली आहे.

त्यानुसार या कार्यालयाकडील आदेश क्र.पीटीके/वतन/एसआर/२५/१३ दि.०९/१२/२०१३ मध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

क्रमांक-पीटीके/वतन/एसआर/२५/२०१३ दिनांक-११ /०३/२०१९
मौजे पिंपरी सांडस, ता. हवेली, जि. पुणे येथील विक्री जमीनीचा तपशिल.

| गाव | ग.नं | क्षेत्र(हे.आर) | आकार (रु.पै.) | ७/१२ प्रमाणे कब्जेदार इसम |
|---|---|---|---|---|
| मौजे पिंपरी सांडस ता.हवेली जि.पुणे | ३९०पै. | २.९४ | ०५=५६ | बबन बाबूराव निकाळजे<br>पोपट बाबूराव निकाळजे<br>प्रभाकर बाबूराव निकाळजे<br>मधुकर बाबूराव निकाळजे<br>मोहन आबूजी निकाळजे<br>कांतीलाल आबूजी निकाळजे<br>साहेबराव आबूजी निकाळजे<br>दत्तात्रय आबूजी निकाळजे<br>शेवंती आबूजी निकाळजे<br>सुंदराबाई आबूजी निकाळजे<br>शांताबाई लालू भोंडवे<br>ताराबाई अर्जुन पोखरे |

वर नमूद केलेली जमीनी भुतपर्व इनाम वर्ग ६ ब च्या असून, ती मुंबई कनिष्ठ गांव नोकर वतने नष्ट करणेचा कायदा १९५८ अन्वये दि.०१/०८/१९५९ पासून खालसा झालेचा फेरफार नं.१५२० अन्वये नोंदविला आहे. मुळ वतनदाराने प्रारंभिक कब्जेहक्काची सा-याचे ३ पट रक्कम सरकारला विहीत मुदतीत जमा केलेने संबंधित तहसिलदार यांचेकडील आदेशानुसार फेरफार नंबर ०८ अन्वये नवीन शर्तीवर पुनर्दान करणेत आलेली आहे.

उपरोक्त जमीनीचे मूळ वतनदार मयत झालेवर त्यांचे वारस दाखल झाले आहेत.

वरील कब्जेदार / वतनदार यांनी प्रश्नांकित जमीन खालील कारणास्तव श्री. बाळासाहेब चंद्रकांत बोराटे यांना विक्री करणेकामी जबाब दिला आहे.

जमीन विक्रीचे कारण:- आर्थिक अडचणीमुळे जमीन विक्री करणार आहेत.

प्रश्नांकित जमीनीचे जमीन खरेदीदारांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे

| नांव व पत्ता | जमीन खरेदी प्रयोजन | शेतकरी असलेचा पुरावा | धारण क्षेत्र हे.आर |
|---|---|---|---|
| श्री. बाळासाहेब चंद्रकांत बोराटे रा.ससाणेनगर, हडपसर, ता.हवेली जि.पुणे | शेती | प्रकरणी श्री.बाळासाहेब चंद्रकांत बोराटे यांचे नावे तहसिलदार हवेली यांचेकडील दि.२७/०२/२०१३ रोजीचा शेतकरी असलेबाबतचा दाखला सामील असे. | २.१९ |

मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचेकडील पूर्वमंजूरीचे ज्ञापनातील अट क्र.ई नुसार प्रस्तुत जमीन विक्री परवानगीकामी हरकत आहेत अगर कसे? याबाबत तहसिलदार हवेली यांनी त्यांचेकडील पत्र क्र. वतन/कावि/८२६/२०१३ दि.१८/१०/२०१३ अन्वये कोणत्याही प्रकारची लेखी हरकत प्राप्त झाली नसल्याचे कळविले आहे.

या कामी दैनिक केसरीमध्ये दि.१९/०३/२०१३ रोजी जाहीर दवंडी दिलेली आहे. सदर जमीन संपादनात व लाभक्षेत्रात येत नसलेबाबत अथवा कोणत्याही प्रकल्पाने बाधीत होत नसलेबाबत कामगार तलाठी यांचा दाखला प्रकरणी सामील आहे.

प्रश्नाधिन जमीनीचे चालु बाजारभावाप्रमाणे होणारे मुल्यांकन खालीलप्रमाणे आहे.

| सन २०१३ चे शिघ्रसिध्द गणकाप्रमाणे होणारे जमीनीचे मल्यांकन | बाजारमूल्य दर रु.१७,५७,०००/- प्रती हे. | |
|---|---|---|
| अ) अनर्जित उत्पन्नाची होणारी रक्कम | १०० % | ५० % |
| ग.नं. ३९०पै. क्षेत्र २ हे. ९४ आर | ५२,७७,३००/- | २६,३८,६५०/- |
| वसुल पात्र एकुण रक्कम | | २६,३८,६५०/- |

क्रमांक-पीटीके/वतन/एसआर/२५/२०१३ दिनांक-११ /०३/२०१९

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे खंड दोन (परिपत्रक क्र.३) चे परिच्छेद व शासन परिपत्रक दि.४/२/८३, ८/९/८३, १६/५/८५ व शासनपत्र दिनांक १०/३/२००० तसेच दि. ९/७/२००२ व २९/५/२००६,दि.२९/०४/२००८ व ०२ ऑगस्ट २००८ अन्वये प्रस्तुत प्रकरणी प्रश्नांकित जमीनीचे सा-याच्या १० पट नजराणा रक्कम रु.५६/- + ०८/- एकूण ६४/- तसेच चालू बाजारभावाचे ५० टक्के रक्कम रुपये २३,३८,६५०/- व रक्कम रु.३,००,०००/- अशी एकुण रक्कम रु.२६,३८,७१४/- अनर्जित उत्पन्नाची म्हणून भरणेचे अटीवर जिल्हाधिकारी **शेती प्रयोजनार्थ** विक्री परवानगी देणेस सक्षम आहेत.

तसेच शासन परिपत्रक दि. १०/०३/२००० प्रमाणे अशा प्रकरतावारा पूर्व मान्यता कळविणेरा विभागीय आयुक्त यांना प्राधिकृत केले आहे. त्यामुळे त्यांनी त्यांचेकडील ज्ञापन क्र.मह/वतन/सीआर/२५५५/१३ दि.२०/०९/२०१३ अन्वये पूर्व मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उक्त जमीन खालील शर्ती व अटीवर **शेती प्रयोजनार्थ** विक्री परवानगी देणेत येत आहे.

## अटी

१) प्रश्नांकित जमीनीचे सा-याच्या १० पट नजराणा रक्कम रु.५६/- + ०८/- एकूण ६४/- तसेच चालु बाजारभावाचे ५० टक्के रक्कम रुपये २३,३८,६५०/- व रक्कम रु.३,००,०००/- अशी एकुण रक्कम रु.२६,३८,७१४/- (अक्षरी- सव्वीस लाख अडोतीस हजार सातशे चौदा पक्त.) इतकी अनर्जित उत्पन्न म्हणून दिनांक-०६/११/२०१३ अन्वये चलन क्र.०६१३ व १०४७९, पावती क्र.५३४९०५२ स्टेट बँक ऑफ इंडिया, पुणे ट्रेझरी शाखा यांचे कार्यालयात भरणा करुन मूळ चलनाची प्रत अर्जाद्वारे सादर केली आहे.

२) सदर जमिनीची **शेती प्रयोजनार्थ** विक्रीसाठी परवानगी देण्यात आली आहे. ज्या प्रयोजनासाठी परवानगी दिलेली आहे, त्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर एक वर्षाचे आत सुरु करावा. अन्यथा सदरची जमीन कोणतीही भरपाई न देता सरकार जमा करणेत येईल.

३) उक्त जमीनीचे खरेदीखताचे वेळी वतनदार / नियोजित खरेदीदार यांनी समक्ष सब रजि. यांचे कार्यालयात उपस्थित राहून दस्तावर सही / अंगठे करणेचे आहेत.

४) प्रश्नांकित जमीनीचे नियोजित खरेदीदार यांनी जमिनीचा वापर **शेती प्रयोजनार्थ** करणेचा आहे. शेती व्यतिरिक्त वापरास चालू बाजार मुल्याचे ५०% नुसार होणारी नजराणा रक्कम मधून पूर्वी शासन जमा केलेली नजराणा रक्कम रु.२६,३८,६५०/- वजा करता उर्वरीत फरकाची रक्कम भरण्यास पात्र असा शेरा ७/१२ चे इतर हक्कात २ हे.९४ आर पुरता दाखल करणेत यावा. शेती व्यतिरिक्त जमीन वापरास सक्षम अधिका-याची पूर्व परवानगी घेणे खरेदीदार यांचेवर बंधनकारक राहील.

५) उक्त जमीनीचे खरेदीदार यांनी संबंधित सक्षम अधिकाऱ्याकडे विहीत नमुन्यात करारपत्र / कबुलायत करुन देणे आहे.

६) कोणत्याही प्रचलित कायद्यातील तरतुदीचा भंग होता कामा नये.

वरील कोणत्याही अटीचा भंग झालेचा अगर कोणत्याही प्रस्तावातील माहिती खोटी असल्याचे आढळून आलेस या अन्वये दिलेली मान्यता रद्द करुन नुकसान भरपाई न देता जमीन सरकार जमा केली जाईल.

क्र.पीटीके/वतन/एसआर/२५/२०१३
पुणे-०१ दि-११ /०३/२०१९

(रमेश काळे) ११/३
अपर जिल्हाधिकारी, पुणे

प्रत- श्री. बबन बाबूराव निकाळजे व इतर-११ रा. पिंपरी सांडस, ता. हवेली, जि. पुणे
प्रत- श्री. बाळासाहेब चंद्रकांत बोराटे रा. ससाणेनगर, हडपसर, ता. हवेली, जि. पुणे
प्रत- श्री. वसंत रामचंद्र खांदवे व मोहन रामचंद्र खांदवे, दोघेही रा.स.नं.२७२, वडगांव शिंदे रोड, बंधुप्रेम ट्रेडर्स, ता. हवेली जि. पुणे
प्रत- मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना माहितीसाठी सादर
प्रत- तहसिलदार, हवेली जि.पुणे यांचेकडे आदेशाची गाव दप्तरी नोंद घेणेकामी रवाना.
प्रत- एन.आय.सी.कक्षाकडे माहितीसाठी अग्रेषित.

प्रमाणित प्रत

तहसिलदार कुळकायदा शाखा
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.

क्रमांक-पीटीके/वतन/एसआर/२५/२०१३ दिनांक-   /०३/२०१९